# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक ५ जून, २०१४
## (सकाळी १०.०० ते ११.०० वाजेपर्यंत)

**राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.**

## (सकाळी ११.१५ वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे :-**

**वने मंत्री** : "भारतीय वन (महाराष्ट्र) (ग्रामवन नेमून देणे, त्याचे व्यवस्थापन करणे व ती रद्द करणे यांचे विनियमन) नियम, २०१४ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एबाबी.२०१०/प्र.क्र.१८९/फ-९, दिनांकित १३ मे, २०१४", सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "रोजगार हमी योजना समितीचा अठ्ठाविसावा अहवाल", सादर करणे.**

**चार : "अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त", सादर करणे.**

**पाच : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**सहा : (बुधवार, दिनांक ४ जून, २०१४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) (क्रमांक १ ते ४) -**

(१) **सर्वश्री. संजय दत्त,** शरद रणपिसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.दिपकराव साळुंखे, नरेंद्र पाटील, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"स्थानिक संस्था कर (एलबीटी) शासनाने रद्द करावा अशी राज्यातील व्यापाऱ्यांची असलेली मागणी, एलबीटी विरोधात असहकार आंदोलन छेडण्याचा ठराव माहे मे-२०१४ च्यासुमारास झालेल्या व्यापाऱ्यांच्या राज्यव्यापी बैठकीत एकमताने घेण्यात येणे, राज्यातील सर्व व्यापारी वर्गात या कराबाबत असलेला असंतोष, नागपूर, सांगली, अकोला, सोलापूर तसेच ठाणे येथील व्यापाऱ्यांना एलबीटीमुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत असणे, व्यापाऱ्यांना एखाद्या

गुन्हेगाराप्रमाणे वागवले जात असणे, जकातीला पर्याय म्हणून एलबीटी आणला गेला, परंतू हा कर हटवून एलबीटीमुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे अशी व्यापारांची होत असलेली मागणी, राज्य शासनाने एलबीटी करप्रणालीबाबत सकारात्मक निर्णय घेऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. गोपीकिसन बाजोरिया,** पांडुरंग फुंडकर, डॉ.रणजित पाटील **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तिर्थक्षेत्राच्या विकासकामांसाठी राज्य शासनातर्फे ३६०.४० कोटी रुपयांची मंजुरी दिनांक ५ मे, २०११ ला देण्यात येणे, शेगांव विकास आराखड्यातील २६ कि.मी. पैकी फक्त १४ कि.मी. रस्त्यांचे काम झालेले असून तेही अत्यंत निकृष्ट दर्जाचे होणे, शेगांव विकास आराखड्यासाठी ९० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी उपलब्ध असतांनाही सदर कामाकरिता अधिक निधीची होत असलेली मागणी, शेगांव विकास आराखड्यासंदर्भात विविध शासकीय विभागात समन्वय नसल्याने कामाची गती मंदावून त्याचा गुणवत्तेवर झालेला परिणाम, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(३) **श्रीमती शोभाताई फडणवीस,** डॉ.अपूर्व हिरे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात एकही सहकारी साखर कारखान्याची विक्री होणार नाही, तसेच यापूर्वी विक्री झालेल्या साखर कारखान्यांच्या विक्री व्यवहाराची चौकशी करण्यात येईल, असे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी दिलेले असतांनाही राज्य सहकारी बँकेने राज्यातील सात साखर कारखान्यांबरोबरच दोन सूत गिरण्यांची विक्रीची प्रक्रिया दिनांक २८ एप्रिल, २०१४ रोजी वा त्यासुमारास सुरु करणे, मंत्रिमंडळाने दिनांक १० सप्टेंबर, २०१३ रोजी राज्यातील आर्थिकदृष्टया कमकुवत सर्वच साखर कारखाने खाजगी संस्था अथवा थकबाकीदार कारखाने लिलावात काढण्याची प्रक्रिया थांबविण्याचे आदेश संबंधितांना देऊन देखील सात कारखान्यांच्या विक्रीची प्रक्रिया सुरु केली जाणे, पुनःश्च आर्थिकदृष्टया कमकुवत साखर कारखाने विक्रीस काढण्यात आल्याने राज्यातील जनतेत पुन्हा क्षोभ निर्माण होणे, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री.अमरसिंह पंडित,** धनंजय मुंडे, डॉ.रणजीत पाटील, सर्वश्री.पांडुरंग फुंडकर,

गोपीकिसन बाजोरीया **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील अनेक गरजू रुग्णांना जीवनदायी ठरलेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत हृदय विकार झटका (विना गुंतागुंत), टायफाईड, पॅराफेल्जीया (पाय लुळे होणे), गॅस्ट्रो इनफाईटीस, कंबरेच्या मणक्याची शस्त्रक्रिया, ॲपेंडिक्स, हरणीया, पाईस, हायड्रोसिल, गुडघा सांध्याची शस्त्रक्रिया, नवजात शिशुचे उपचार, बाळांतपण, सिझर, हिस्टॉमीस आदी अत्यंत महत्वांच्या आजारांचा समावेश नसणे, रोगाचे निदान झाल्याशिवाय उपचाराचा खर्च मंजूर होत नसणे, अतितात्काळ रुग्णांना कागदोपत्री सोपस्कार पूर्ण झाल्याशिवाय योजनेचा फायदा न मिळणे, टोल फ्री क्रमांक अथवा इतर दूरध्वनीवरुन योजनेबाबत कोणतीही कार्यवाही मुदतीत न होणे, अनेक रुग्णालयांकडून अनामत रक्कम घेतल्याशिवाय उपचार न करणे, ग्रामीण भागातील रुग्णालयांना मंजूर झालेला खर्च शासनाकडून न मिळणे, योजनेसाठी शासन स्तरावर अत्यल्प तरतूद असल्यामुळे अनेक रुग्ण उपचारापासून वंचित राहणे, यामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब गरजू रुग्ण योजनेच्या फायद्यापासून वंचित राहणे, परिणामी जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**सात : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

**आठ : (मंगळवार, दिनांक ३ जून, २०१४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) -**

**सर्वश्री हेमंत टकले,** माणिकराव ठाकरे, अमरसिंह पंडित, संजय दत्त, संदिप बाजोरिया, शरद रणपिसे, विक्रम काळे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष झाबंड, हरिसिंग राठोड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

विदर्भासह मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकणात माहे फेब्रुवारी-मार्च-एप्रिल व मे २०१४ मध्ये गारपीट व विजांच्या कडकडाटासह बेमोसमी पावसाने अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत होणे, कोकणात आंबा पिकांचे मोठे नुकसान होणे, राज्यात गारपीटीमुळे व वीज कोसळून सुमारे ३० व्यक्तींचा झालेला मृत्यु, शेकडो घरांचे झालेले नुकसान, पशुधनाचे झालेले नुकसान, यापूर्वी फेब्रुवारी-मार्च, २०१४ मध्ये झालेल्या गारपीट आणि अवकाळी पावसाने हवालदिल झालेल्या विदर्भ, मराठवाडा व राज्यातील इतर

भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने चार हजार कोटी रुपये मदतीचे दिलेले पॅकेज, सहा महिन्यांची वीजबिले माफ आणि पीक कर्जाचे व्याज माफ करण्याचा दिनांक १९ मार्च, २०१४ रोजी निर्णय घेण्यात येणे, गारपीट व अवकाळी पावसामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून शासनाने रक्कम जाहीर करुनही व पंचनामे होऊनही गारपीटीच्या नुकसान भरपाईची रक्कम काही शेतकऱ्यांना न मिळणे, तसेच अवकाळी पावसाच्या नुकसानीसंदर्भात शेतकऱ्यांनी शेतमालाचा विमा काढूनही विम्याची रक्कम न मिळणे, त्यामुळे शेतकऱ्यांत पसरलेले संतापाचे व चिंतेचे वातावरण, शासनाने राज्यात झालेल्या गारपीट व अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना व फळबागायतदारांना तसेच मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना व जबर जखमी झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, गारपीट व अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या नुकसानग्रस्तांना भरघोस व तातडीने मदत देण्यासाठी विशेष अनुदानामध्ये वाढ करण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.

## - (दुपारी १.३० वाजता मध्यंतर) -

**(दुपारी २.०० वाजता)**

**नऊ :** **उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री "सन २०१४-२०१५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प", सादर करतील.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ४ जून, २०१४.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.